# भारती विद्यापीठ मध्यवर्ती कार्यालय, पुणे ३०.

जा.क्र. :भा.वि./म.का./वर्धापनदिन/१२५L /२०२०-२०२१ दिनांक : ०३/०५/२०२१

## परिपत्रक

प्रति,
सर्व शाखाप्रमुख विभागप्रमुख,
भारती विद्यापीठ,
पुणे व इतर केंद्रे

विषय : सोमवार, दिनांक १० मे २०२१ रोजी पुणे येथे संपन्न होणाऱ्या भारती विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिन समारंभाबाबत.

भारती विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिनाचा मुख्य समारंभ सोमवार, दि. १० मे २०२१ रोजी सकाळी ९.३० वाजतां आभासी पध्दतीने (व्हर्च्युअल मोडवर) साजरा होणार आहे.

आभासी पध्दतीने (व्हर्च्युअल मोडवर) होणाऱ्या या महत्वपूर्ण समारंभाचे माननीय नामदार श्री. राजेश टोपे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री, महाराष्ट्र राज्य व पद्मश्री माननीय डॉ. सुखदेव थोरात, माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली हे प्रमुख अतिथी असून माननीय प्रा. डॉ. शिवाजीराव कदम, कुलपती, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे हे सन्माननीय अतिथी आहेत. समारंभाचे अध्यक्षस्थान माननीय नामदार डॉ. विश्वजीत कदम, कार्यवाह, भारती विद्यापीठ, प्रकुलगुरू, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय व सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा आणि संरक्षण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, मराठी भाषा, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य भूषविणार आहेत. तसेच या समारंभास माननीय श्री. आनंदराव पाटील, कार्याध्यक्ष, भारती विद्यापीठ व माननीय डॉ. इंद्रजित मोहिते, उपाध्यक्ष, भारती विद्यापीठ माननीय डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरू, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, माननीय डॉ. सौ. अस्मिता राजेंद्र जगताप, कार्यकारी संचालिका, भारती हॉस्पिटल यांची सन्माननीय उपस्थिती लाभणार आहे.

संस्थेच्या ५७ व्या वर्धापनदिनाच्या आभासी पध्दतीने (व्हर्च्युअल मोडवर) होणाऱ्या समारंभास सर्व प्राचार्य, संचालक, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांनी उपस्थित असणे अनिवार्य आहे. त्या अनुषंगाने खाली दिलेल्या लिंकचा वापर करुन त्यांनी आपली उपस्थिती दर्शवावी.

**http://www.youtube.com/user/bharatividyapeethuni**

या समारंभात सहभागी झालेल्या प्राध्यापक व शिक्षकेत्तर सेवकांची यादी दिनांक ११ मे २०२१ रोजी खाली स्वाक्षरी करणार यांचेकडे कार्यालयीन वेळेत सादर करावी.

(signature)

**( डॉ. के. डी. जाधव )**
सहकार्यवाह( प्रशासन)
भारती विद्यापीठ, पुणे.

प्रत माहितीसाठी :-

१. मा. कुलपती, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे यांचे स्वीय सहाय्यक.
२. मा. कार्यवाह , भारती विद्यापीठ पुणे यांचे स्वीय सहाय्यक.
३. मा. कुलगुरू, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे यांचे स्वीय सहाय्यक.
४. मा. निवासी कार्यालय, भारती विद्यापीठ, पुणे.
५. मा. कुलसचिव, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे.
६. श्री. जनसंपर्क अधिकारी, भारती विद्यापीठ, पुणे.

Mr. Sajid Pathan to email to all Teaching faculty and Non-Teaching Staff.

* Mr. Nadare for attendance records. (signature) 05/05/2021